दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१९/२०१७-१८
दि.१६/०२/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.सोहेल मु. खान, ................अपिलार्थी
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
सहा.आयुक्त, सा.प्र.

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे दि.१०/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

मुद्दा क्र.१) मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१)(ख) अन्वये १७ बाबींची माहिती प्रसिध्द करण्यात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती याबाबत तपशीलवार माहिती मिळावी.

मुद्दा क्र.२) वरील नमुद माहिती प्रसिध्द केल्याचा दिनांक पासून किती कालावधी पर्यंत कार्यालयात जतन केले जाते याबाबत तपशीलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी.

मुद्दा क्र.३) वरील नमुद माहिती आवश्यक कालावधीसाठी कार्यालयात जतन न केल्याचे आढळल्यास संबंधित दोषी अधिकारी विरुध्द काय कार्यवाही केले जाते याबाबत तपशीलवार माहिती उपलब्ध करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१६/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.सा.प्र./२१९/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी तथा सहा.अयुक्त, सामान्य प्रशासन विभाग हे रजेवर असल्याकारणाने सदर सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, सामान्य प्रशासन विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१०/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास १५ दिवसांत मुद्देनिहाय माहिती विनाशुल्क देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

OC

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

20/02/18.

२) जन माहिती अधिकारी तथा – for Akshay 17/02/18
सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.